■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस





मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ५२ ● मंगळवार, दि. १९ ते २६ मे २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.


## बंद असलेली नळ योजना सुरु करा




**रिसोड**ः गावठाण हद्दीतील गट क्र. २३१ मधील ०.३१ आर जमीन गावाच्या स्मशानभूमीसाठी राखीव असलेल्या जमिनीवरील अतिक्रमण काढा, गावातील जिल्हा परिषद शाळे भोवती झालेले अतिक्रमण काढावे.अशि मागणी भागवतराव कृष्णराव वाघ व ग्रामस्थ गावकरी मंडळी शेलगाव राजगुरे ता. रिसोड जि. वाशिम यांनी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, गटविकास अधिकारी पंचायत समिति रिसोड यांना १२ मे रोजी दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मौजे शेलगाव(रा) येथे जल मिशन अंतर्गत नळ योजना राबविण्यात आली होती. सदर योजने अंतर्गत गावात नळ जोडण्यात आले. काही ठिकाणी जोडण्याचे राहिले आहे. जल मिशन अंतर्गत धरणावर विहीर ही खोदण्यात आली आहे. विहिरीला पाणी आहे परंतु सदर विहिरीतील पाणी आजपर्यंत गावात आले नाही. त्यामुळे जल मिशन मध्ये मोठा घोटाळा झाल्याचे आल्याचे दिसून येते. त्यामुळे गावात पाणी आलेच नाही. या विषयावर तात्काळ लक्ष घालून सदरची नळ योजना चालू करण्याचे आदेश द्यावेत गावठाण हद्दीतील क्षेत्र गट नं. २३१ मधील ०.३१ आर जमीन गावाच्या स्मशानभूमीसाठी राखीव ठेवली होती. परंतु सदर जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. तरी सदर जमिनीवरील अतिक्रमण काढून जमीन मोकळी करून द्यावी म्हणजे तिथे स्मशानभूमीचे शेड बांधता येईल व गावातील स्मशानभूमीचा प्रश्न सुटेल अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे निवेदनावर असंख्य गावकरी मंडळींच्या स्वाक्षऱ्या आहेत. ता. प्र.

## पि.यु. मापारी यांची जिल्हाध्यक्षपदी चौथ्यांदा निवड



**रिसोड**ः वाशिम जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी यांची आमसभा घेण्यात आली. त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील मंडळ अधिकारी यांची कार्यकारिणी नव्याने निर्माण करण्यासाठी या आमसभेध्ये मध्ये विषय घेण्यात आला. त्यामध्ये पि.यू. मापारी मंडळ अधिकारी आपल्या कर्तुत्वगुनाने व आपल्या गोडवाणीने सर्व मंडळ अधिकारी व सहकारी यांना आपल्या कवेत घेतले. त्याचीच प्रचिती आज घेतलेल्या आमसभेत आली. सविस्तर असे की दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंडळ अधिकारी यांची आमसभा घेण्यात आली त्यामध्ये अनेक विषय घेण्यात आली व आमसभेचा मुख्य विषय टप्प्यावर येऊन पोहोचला त्यामध्ये वाशिम जिल्ह्यातील कार्यकारिणीची नव्याने निवड घेण्यात यावी असे घोषित केले. त्यामध्ये "अहंकाराचा वारा मज न लगे" या उक्तीप्रमाणे पि.यू. मापारी मंडळ अधिकारी यांना या पदाचा कधी अहंकार झाला नाही. त्यामुळे सातत्याने त्यांची वाशिम जिल्हा मंडळ अधिकारी पदी चौथ्यांदा बिनविरोध निवड झाली. याचे स्वागत वाशिम जिल्ह्यातील सर्व मंडळ अधिकारी यांनी त्यावेळी केले व याचे या क्षेत्रातील व त्याच्या चाहत्यांनी स्वागत केले. त्यांच्या निवडीमुळे सर्व मंडळातील सहकाऱ्यांना आनंद झाला. ही सभा वाटाणे लॉन्स येथे संपन्न झाली. या कार्यकारणीची निवड पुढील प्रमाणे पियू मापारी -मंडळ अधिकारी जिल्हाध्यक्षपदी निवड, उपाध्यक्षपदी- गजानन इप्पर,व निलेश गुगळे व सचिवपदी- संजय रायतकर, कोषाध्यक्षपदी- संजय बोरकर, सहसचिव - वामन नवघरे यांची पुढील कार्यकाळासाठी बिनविरोध निवड झाली. त्यामुळे सर्व मंडळींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होऊन ही सभा सामोपचाराने संपन्न झाली. श.प्र.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी मोफत कृत्रिम अवयव शिबिराचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**वाशिम,दि.१२ मे (जिमाका) श्री भगवान महाविर विकलांग सहायता समिति, दिल्ली यांच्या जयपूर फुट कॅम्प अंतर्गत दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत कृत्रिम अवयव तसेच विविध सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात येणार असून जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

या उपक्रमाअंतर्गत दि. १८ मे २०२६ ते २५ मे २०२६ या कालावधीत तपासणी व साहित्य वितरण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी यांच्या समवेत आढावा सभा पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी विठ्ठल भुसारे, शासकीय दिव्यांग संमिश्र केंद्राचे अधीक्षक ज्ञानोबा पुंड आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निर्देश देतांना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, लाभार्थ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या. तसेच जिल्ह्यातील दिव्यांग संघटनांनीही या उपक्रमासाठी आवश्यक ते सहकार्य करावे, अधिकाधिक गरजू लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी व शिबिर यशस्वी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे सांगितले. जयपूर फुट कॅम्पच्या माध्यमातून व्हिल चेअर, चालण्याची काठी, कानाची मशिन, तिवई काठी (ट्रीपॉड), मानेचा बेल्ट, कमरेचा बेल्ट, मनगटाचा बेल्ट, टॉयलेट चेअर, चष्मा, वॉकर, गुडघ्याचा बेल्ट, कॅलीपर, शुज आदी विविध सहाय्यक साधनांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. शिबिराचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे १) निवासी मतिमंद मुलांची कवठा कार्यशाळा, ता. रिसोड, जि. वाशिम दि. १८ मे २०२६ व १९ मे २०२६ वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : रवि हरिमकर मो.क्र. ८८८८२०४३३७ २) जिल्हा परिषद हायस्कूल, ग्रामीण पोलीस स्टेशनच्या मागे, वाशिम दि. २१ मे २०२६ व २२ मे २०२६ वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : कृष्णा सावसुंदर मो.क्र. ७३५०३३५५०७ ३) पंचायत समिति, कारंजा, ता. कारंजा, जि. वाशिम दि. २४ मे २०२६ व २५ मे २०२६ वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ संपर्क प्रमुख : सचिन अवटिक मो.क्र. ९६०४४३७७९५ शिबिरासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्डची झेरॉक्स प्रत तसेच उपलब्ध असल्यास युडीआयडी कार्डची झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते

## रामनगर वस्तीत जात प्रमाणपत्र वाटपासाठी कॅम्प लावण्याची मागणी



**रिसोड** : येथील रामनगर (वडरपुरा) वस्तीमधील भटक्या व विमुक्त जातीच्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र मिळण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर, भटक्या विमुक्त कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था विदर्भ प्रांत-भंडाराचे वाशीम जिल्हा अशासकीय सदस्य गोपाल किसन मुधळकर यांनी रिसोडच्या तहसीलदार यांना लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, रामनगर वस्तीमध्ये राहणारे नागरिक हे प्रामुख्याने भटक्या व विमुक्त जातीचे आहेत. मात्र, त्यांच्या जातीच्या नोंदी कुठेही सहज आढळून येत नाहीत. या वस्तीतील अनेक मुले सध्या शिक्षण घेत आहेत, परंतु त्यांच्याकडे अधिकृत जात प्रमाणपत्र उपलब्ध नाही. दाखल्यांभावी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी विनंती मुधळकर यांनी केली आहे. रामनगर वस्तीमध्येच प्रशासकीय गृहचौकशी अहवाल पूर्ण करून, थेट वस्तीतच एका विशेष कॅम्पचे (शिबिर) आयोजन करण्यात यावे, जेणेकरून गरजू विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना जागेवरच जात प्रमाणपत्रांचे वाटप करता येईल, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. श.प्र.

## डिझेल टंचाईमुळे शेतीची कामे ठप्प

**रिसोड** : गेल्या काही दिवसांपासून बाजारात निर्माण झालेल्या डिझेल आणि इंधनाच्या टंचाईमुळे ग्रामीण भागातील शेतीची चक्रे पूर्णपणे रुतली आहेत. नांगरणी, रोटावेटर, पेरणीपूर्व मशागत अशी अत्यंत महत्त्वाची कामे डिझेल अभावी ट्रॅक्टर जागच्या जागी उभे असल्याने रखडली आहेत. ऐन हंगामाच्या तोंडावर डिझेल मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, आता जनतेमधून आणि शेतकरी वर्गातून एकच संतप्त सवाल विचारला जात आहे– 'जगात काहीही संकट आले, तरी त्याचा पहिला आणि थेट फटका नेहमी शेतकऱ्यालाच का बसतो?'

??दरवर्षी या काळात शेतात मशागतीची लगबग असते, पाईप लाईन टाकणे नागरणे रोटावेटर. मात्र, यंदा डिझेलचा तुटवडा असल्याने ट्रॅक्टरचालक, जेसिबी चालक यांनी हात वर केले आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे स्वतःची साधने आहेत, त्यांनाही पंपावर डिझेल मिळवण्यासाठी तासन्‌तास रांगेत उभे राहावे लागत आहे. रोटावेटर आणि नांगरणी वेळेत झाली नाही, तर पुढील संपूर्ण हंगाम लांबणीवर पडण्याची भीती निर्माण झाली आहे. ?सध्याच्या जागतिक परिस्थितीवर आणि युद्धाच्या कारणांवर बोट ठेवत बाजारात सर्वच वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. याच पार्श्वभूमीवर जनतेमधून प्रशासनाला आणि व्यवस्थेला काही रोकडे सवाल विचारले जात आहेत: खरेदी महाग, विक्री स्वस्त का? युद्ध सुरू झाले की आंतरराष्ट्रीय बाजाराचे कारण देऊन डिझेल, खाद्यतेल, खते आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडतात. व्यापारी आणि कंपन्या त्यांचे भाव एका रात्रीत वाढवतात. मात्र, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला (जसे की कापूस, सोयाबीन, भाजीपाला) भाव का मिळत नाही? केवळ डिझेल टंचाईचा तात्पुरता प्रश्न नसून शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा लढा बनत चालला आहे. प्रशासनाने याकडे केवळ एक 'टंचाई' म्हणून न बघता, व्यावसायिक आणि अत्यंत काळजीपूर्वक दृष्टीकोनातून लक्ष देणे गरजेचे आहे. (वि. प्र)

## शेतमाल दरातील चढ-उतारामुळे शेतकरी संतप्त

रिसोड (शहर प्रतिनीधी) शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेला कापूस, तूर आणि सोयाबीन विक्रीसाठी बाजारात आणला तेव्हा त्यांना कवडीमोल भाव मिळाला. मात्र, शेतकऱ्यांकडील माल संपताच कापूस १० हजार रुपये तर सोयाबीन ७हजार रुपयांच्या घरात पोहोचल्याने शासनाचे धोरण नेमके शेतकऱ्यांच्या हिताचे आहे की व्यापाऱ्यांच्या, असा संतप्त सवाल रिसोड तालुक्यातील शेतकरी उपस्थित करू लागले आहेत.

यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणासोबतच बाजारभावाचाही मोठा बाजारात माल येताच दर पाडण्याचे सत्र सुरू झाले होते. हंगामात सोयाबीनला अवघा ३५०० ते ४ हजार रुपये भाव मिळाला, तर रुपयांपर्यंतच मर्यादित राहिले. कर्जफेड, शेतीखर्च आणि घरखर्च भागवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण माल कमी दरात विकून टाकला. आता मात्र कापूस १० हजार रुपये प्रतिक्विंटल तर सोयाबीन ७ हजार रुपये प्रतिक्विंटल दराने विकले जात आहे. त्यामुळे रात्रंदिवस मेहनत करून पीक घेणारा शेतकरी तोट्यात आणि व्यापारी मात्र मालामाल अशी भावना शेतकऱ्यांमध्ये तीव्र होत आहे. शेतमालाचे भाव हंगामाच्या सुरुवातीलाच का वाढवले जात नाहीत ? व्यापाऱ्यांच्या गोदामात माल जमा झाल्यानंतरच बाजारात तेजी का येते?, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. शासन आणि व्यापाऱ्यांच्या संगनमतामुळेच दर पाडले जात असल्याचा आरोपही केला जात आहे. श..प्र.

# इटली आणि भारत : मैत्रीचा नवा अध्याय

भारत आणि इटली हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वपूर्ण केंद्रांच्या अगदी मध्यभागी वसलेले आहेत. हे असे प्रदेश आहेत ज्यांच्याकडे स्वतंत्र क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर त्याऐवजी ते वाढत्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले अवकाश आहेत. भारत आणि इटली यांच्यातील संबंध आता एका निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. अलीकडील वर्षांमध्ये आमच्यातील बंध एका अभूतपूर्व गतीने दृढ झाले असून या मैत्रीपूर्ण संबंधांचे रूपांतर स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांमध्ये रुजलेल्या आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनावर आधारित धोरणात्मक भागीदारीत झाले आहे. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन होत असताना भारत आणि इटली यांच्यातील भागीदारीला उच्चस्तरीय राजकीय आणि संस्थात्मक संवादांद्वारे मार्गदर्शन लाभले आहे. या भागीदारीला एक नवीन आणि उच्च पैलू प्राप्त झाला असून आमची आर्थिक गतिशीलता, सामाजिक सर्जनशीलता आणि हजारो वर्षांपासूनच्या संस्कृतीचे ज्ञान यांचा संगम झाला आहे. आमचे सहकार्य हे आपल्या सामायिक जाणिवेचे प्रतिबिंब आहे की, २१व्या शतकातील समृद्धी आणि सुरक्षितता या राष्ट्रांच्या नवोन्मेष क्षमतेवर, ऊर्जा संक्रमणाचे व्यवस्थापन करण्याच्या कौशल्यावर आणि धोरणात्मक सार्वभौमत्व अधिक बळकट करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल. यासाठी आम्ही आमचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि विविधतेने समृद्ध करण्यास कटिबद्ध आहोत. जेणेकरून नवीन उद्दिष्टांचा पाठपुरावा करता येईल आणि परस्परपूरक सामर्थ्यांचा एकत्रित उपयोग करता येईल. औद्योगिक महासत्ता म्हणून इटलीचे स्थान प्रतिबिंबित करण्याच्या हेतूने इटालियन डिझाईन, उत्पादकतेतील उत्कृष्टता आणि जागतिक दर्जाचे सुपर कॉम्प्युटर्स यांचा आणि भारताची वेगवान आर्थिक वृद्धी, अभियांत्रिकी नैपुण्य, व्याप्ती आणि १०० युनिकॉर्न आणि दोन लाख स्टार्टअप्स असलेली नवोन्मेष आणि उद्योजक परिसंस्था, यांच्यात एक शक्तिशाली समन्वय साधण्याचे आमचे ध्येय आहे.

हे केवळ एकत्रीकरण नसून मूल्यनिर्मितीची सह-प्रक्रिया आहे, ज्यामध्ये आपल्या परस्पर औद्योगिक सामर्थ्यांमुळे एकमेकांची क्षमता अधिक वृद्धिंगत होते. युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील मुक्त व्यापार करार, वाढता व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही दिशांनी मार्ग खुला केला आहे. संरक्षण आणि अंतराळ, हरित तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, वाहन उद्योगातील घटक, रसायने, औषधनिर्माण, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने, पर्यटन आणि इतर क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून आम्हाला २०२९ पर्यंत भारत आणि इटली यांच्यातील व्यापार २० अब्ज युरोपर्यंत वाढवून त्याहीपेक्षा जास्त विस्तार करायचा आहे. जगभरात 'मेड इन इटली'साठी प्रचलित असलेला समानार्थी शब्द म्हणजे उत्कृष्टता हा होय आणि त्याने आज 'मेक इन इंडिया' उपक्रमातील उच्च गुणवत्तेच्या उद्दिष्टांशी निसर्गतः समन्वय साधला आहे. या संदर्भात, इटालियन उद्योगांना भारतात उत्पादन करण्यात वाढलेले स्वारस्य आणि भारतीय उद्योगांची इटलीमधील वाढलेली संख्या, जी सध्या दोन्ही बाजूंनी एक हजारपेक्षा अधिक आहे, ही एक अत्यंत सकारात्मक गोष्ट असून त्यामुळे आपल्या पुरवठा साखळीतील समन्वय वृद्धिंगत होईल.

तांत्रिक नवोन्मेष आमच्या भागीदारीचा गाभा आहे. येणारी दशके अमर्याद व्याप्ती असलेल्या तांत्रिक क्रांतीने आकाराला येतील आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंप्युटिंग, प्रगत उत्पादकता, महत्त्वपूर्ण खनिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांतील प्रगतीने ओळखली जातील. भारताची गतिशील नवोपक्रम परिसंस्था अतिशय कुशल व्यावसायिक प्रतिभासंपन्न मनुष्यबळाने युक्त असून इटलीच्या प्रगत औद्योगिक क्षमतांचा संगम झाल्याने वरील क्षेत्रातील आमचे सहकार्य अधिक नैसर्गिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

## छत्रपती संभाजी महाराजांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

वाशिम, दि.१४ मे (जिमाका): स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आज दि.(१४) मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी सुध्दा प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## श्री पिंगलाक्षी देवी संस्थांच्या अध्यक्षपदी गणेश बगडिया

रिसोड: रिसोडची ग्रामदेवता श्री पिंगलाक्षी देवी संस्थानची नवीन कार्यकारीणी जाहीर झाली असून अध्यक्षपदी गणेश नंदकिशोर बगडिया यांची अविरोध निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून गजानन प्रकाश पांडे, सचिव म्हणून संतोष पुरुषोत्तम वाघमारे तर कोषाध्यक्ष म्हणून अजय राधेश्याम बगडिया यांची निवड करण्यात आली. सदस्य पदी मनीष कमलकिशोर बगडिया, शिवम अजय बगडिया, सचिन सुभाषचंद्र बबेरवाल यांची नियुक्ती करण्यात आली.

रिसोड शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या निसर्गरम्य तलावाच्या काठावरील पिंगलाक्षी देवीचे मंदिर



निजामशाहीच्याही अधिक जुने आहे. स्वातंत्र्योत्तर काळात नागपूर विभागाचा समावेश मध्यप्रदेशात होता तेव्हाच्या सीपी अँड बरार व अकोला जिल्ह्यात आणि नवनिर्मित वाशिम जिल्हा झाल्यानंतर वाशिम जिल्ह्यामध्ये या संस्थांचे नियमित रजिस्ट्रेशनचे नूतनीकरण होत आले आहे.

अतिशय जुन्या या संस्थांच्या मंदिराचा नुकताच जीर्णोद्धार झाला असून येथे विकासाची कामे सुरू आहेत. गणेश बगडिया यांच्या अध्यक्ष कार्यकाळात संस्थांचा अधिक विकास होईल अशी भाविक भक्तांना अपेक्षा आहे. श.प्र.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त शोभायात्रा

वाशिम: धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रिसोड शहरात गुरुवार, 14 मे रोजी उत्साही वातावरणात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांचा दणदणाट, ध्वज पथकाचे आकर्षक संचलन, डीजेच्या तालावर थिरकणारे युवक आणि शिवभक्तांच्या जयघोषाने संपूर्ण रिसोड शहर शिवमय झाले होते. या सोहळ्याची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता बबेरवाल चौकातून शोभायात्रेला प्रारंभ झाला. ही शोभायात्रा जैन गल्ली, परशुराम चौक, अष्टभुजा देवी चौक, मुल्ला गल्ली, आसन गल्ली या मुख्य मार्गावरून जात रात्री दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली, जिथे यात्रेची सांगता झाली. शोभायात्रेदरम्यान संपूर्ण मार्गावर उत्साहाचे वातावरण होते. छत्रपती संभाजी राजे उत्सव समिती आणि रुद्र अवतार हेल्थ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवभक्तीच्या अनोख्या संगमात पार पडला. श.प्र.

**महाराष्ट्र शासन**

## वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय,

भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
खोली क्र. ११३, जिल्हाधिकारी कार्यालय,
काटा रोड, वाशिम - ४४४५०५
ई-मेल sg_washim@rediffmail.com

### निविदा सुचना क्र. महा/भूसविय/वभूवै वाशिम/०१ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना या कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कहि बदल होत असल्यास कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल. निविदा कामाचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | प्रस्तावित उपाय योजना संख्या (ARSS) | अंदाजपत्रकीय एकुण रक्कम रुपये सर्वे करांसहित | निविदा कामांची एकुण रक्कम रुपये करांसहित |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | कारंजा | दुधोरा | 3 | 619974.00 | 619974.00 |
| २ | वाशिम | कारंजा | बेंबडा | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ३ | वाशिम | मंगरूळपीर | निंभी | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ४ | वाशिम | मंगरूळपीर | एकांबा | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ५ | वाशिम | मानोरा | भोयनी | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ६ | वाशिम | मानोरा | वार्डो | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ७ | वाशिम | मालेगाव | चिवरा | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ८ | वाशिम | मालेगाव | दुधाळा | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ९ | वाशिम | रिसोड | वाडजी | 3 | 619974.00 | 619974.00 |
| १० | वाशिम | रिसोड | येवता | 3 | 619974.00 | 619974.00 |
| ११ | वाशिम | वाशिम | सावरगाव जिरे | 3 | 619974.00 | 619974.00 |
| १२ | वाशिम | वाशिम | उकळी पेन | 3 | 619974.00 | 619974.00 |

निविदा उपलब्ध कालावधी दिनांक १६/०५/२०२६ ते दिनांक २३/०५/२०२६.
निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक २५/०५/२०२६
जा.क्र. वभूवै/भूसविय/पाणी टंचाई/भुजल/२०८/२०२६
दिनांक १५/०५/२०२६
वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम

सही/-
**(वैभव श्रीरामे)**
वरिष्ठ भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम

क्र.विमाका/अम/जाही/१५५

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# तिसऱ्या अपत्यामुळे वानखेडे पती-पत्नीचे नगरसेवक पद रद्द

## जिल्हाधिकाऱ्यांचा वानखेडे दाम्पत्यावर अपात्रतेचा हातोडा

रिसोड : नगर परिषदेच्या राजकारणात मंगळवारी एकच खळबळ उडाली. प्रभाग क्रमांक ५-ब मधील नगरसेवक बंडू रामकिसन वानखेडे व प्रभाग क्रमांक १०-अ मधील नगरसेविका शितल बंडू वानखेडे यांना जिल्हाधिकाऱ्यांनी तिसऱ्या अपत्याच्या कारणावरून अपात्र ठरवले आहे. गोपाल बंडू वानखेडे हे त्यांचे तिसरे अपत्य असल्याचे पुराव्यांवरून सिद्ध झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचे आदेश दिले.

नगर परिषद निवडणुकीत बंडू वानखेडे यांनी ६१४ मतांनी पवन छित्तरका यांचा, तर शितल वानखेडे यांनी ११२२ मतांनी यशवंत देशमुख यांचा पराभव केला होता. मात्र, महाराष्ट्र नागरी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्यास संबंधित व्यक्ती निवडणूक लढवण्यास अपात्र ठरते. याच मुद्द्याचा आधार घेत पराभूत उमेदवार पवन छित्तरका आणि यशवंत देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागितली होती. त्यांनी गोपाल वानखेडे हे तिसरे अपत्य असल्याचे आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे प्रशासनासमोर सादर



केले होते. या प्रकरणी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांची सखोल पडताळणी करण्यात आली. अखेर जिल्हाधिकाऱ्यांनी वानखेडे दाम्पत्याला दोषी धरत त्यांचे नगरसेवक पद तात्काळ प्रभावाने रद्द केले. विशेष म्हणजे, हे दोन्ही नगरसेवक आमदार अमित झनक यांचे कट्टर समर्थक मानले जातात, त्यामुळे या निर्णयाचा परिणाम स्थानिक राजकारणावरही होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे रिसोडमध्ये राजकीय चर्चांना उधाण आले आहे. आता हे दाम्पत्य या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार का? आणि रिक्त झालेल्या या जागांवर पोटनिवडणूक होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ता.प्र.

# रोजगार हमी योजनेतील फेस ऑथेंटिकेशन सक्ती रद्द करा

## डॉ. पुरुषोत्तम जाधव यांची पालकमंत्री यांच्याकडे मागणी

रिसोडः महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांसाठी फेस ऑथेंटिकेशन पद्धत सक्तीची करण्यात आलेली आहे सदर ऑथेंटिकेशन पध्दत रद्द करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पालकमंत्री यांना डॉ. पुरुषोत्तम जाधव यांनी निवेदनातुन केली आहे.

ग्रामीण भागातील अनेक मजुरांकडे योग्य मोबाईल, इंटरनेट सुविधा किंवा तांत्रिक ज्ञान उपलब्ध नसल्यामुळे उपस्थिती नोंदविताना मोठ्या अडचणी येत आहेत. नेटवर्क समस्या, मोबाईल खराब असणे किंवा चेहरा ओळखण्यात अडचणी निर्माण होत असल्यामुळे प्रत्यक्ष काम करूनही मजुरांची हजेरी लागत नाही व मजुरी मिळण्यास विलंब होत आहे. तसेच, ज्या जुन्या विहिरी पूर्वीच्या रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या आहेत व सध्या सुरू असलेल्या योजनेमध्ये, अशा विहिरींवर काम करणाऱ्या मजुरांनाही फेस ऑथेंटिकेशन सक्ती लागू करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी व गरीब मजुरांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, एक, दोन लाख रुपये पगार घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अशाप्रकारची दररोज दोन वेळा फेस ऑथेंटिकेशनची सक्ती करण्यात येत नाही; मात्र केवळ तीनशे रुपये मजुरीवर कष्ट करणाऱ्या गरीब मजुरांना सकाळ-संध्याकाळ रोज फेस ऑथेंटिकेशन करणे बंधनकारक करण्यात आलेआहे. ही बाब शेतकरी व शेतमजुरांवर करण्यात आलेला मोठा अन्याय



असून यामुळे शेतकरी व शेत मजुरांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. तसेच हा अन्याय केवळ मजुरांपुरता मर्यादित नसून, ज्या शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरी मंजूर करून घेतल्या आहेत त्या शेतकऱ्यांनाही याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. फेस ऑथेंटिकेशनमुळे मजूर उपलब्ध होत नाहीत, कामात अडथळे निर्माण होतात व विहिरींची कामे रखडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांनाही मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

फेस ऑथेंटिकेशनची सक्ती लागू करू नये. गरीब शेतमजूर व शेतकऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन सदर सक्तीबाबत तात्काळ रद्द करण्यात यावा, नसता शेतकरी व शेतमजूर यांच्या हितासाठी शेतकरी संघर्ष संघटना शासन व प्रशासन यांना माहिती देऊन तीव्र आंदोलन करेल होणाऱ्या परिणामास शासन व प्रशासन जबाबदार राहील असा इशारा दिलेल्या निवेदनातुन केला आहे. श.प्र.

# रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावे

## लखनसिंग ठाकूर यांची मागणी



रिसोड : रिसोड गावातून जाणारा राज्य मार्ग वाशिम ते लोणार, या मार्गावर रस्त्याच्या कडेलाच रिसोड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती स्थित आहे, वाशिम कडून लोणार कडे जाणारा रस्ता तसेच मेहकर कडून वाशिम हिंगोली कडे जाणारा रस्ता हा तिथूनच वाहतो या रस्त्यावर दिवसभर भरपूर वाहनाची एसटी बसेस ट्रक टँकर ट्रॅक्टर जेसीबी टू व्हीलर फोर व्हीलर यांची वर्दळ सारखी ये जा चालूअसते, कृषी उत्पन्न बाजार समितीचा मुख्य प्रवेशद्वार, बाजूला च असलेली मध्यवर्ती बँक ग्रामीण बँक पतसंस्था, बँक ऑफ इंडिया हे सर्व याच मुख्य रस्त्यावर असल्याकारणाने रस्त्याच्या दोन्ही बाजूने भरपूर प्रमाणात रहदारी सुरू असते त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर जवळपास दिवसातून रोज ३ ते ४ अपघात होतातच मागील वर्षी याच ठिकाणी ट्रॅक्टरचा व मोटरसायकलचा अपघात होऊन एका शाळकरी विद्यार्थ्यांचा प्राण सुद्धा गेलेला आहे, रोज अनेक अपघात होत असतात त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर गतिरोधक बसवणे अत्यंत आवश्यक आहे, रिसोड ग्रामस्थांच्या वतीने गतिरोधक बसविण्यास संबंधित अनेक निवेदन प्राप्त झालेले असल्याकारणाने रिसोड येथील भाजपाचे लखन सिंग ठाकूर रस्ता सुरक्षा समितीमार्फत व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रिसोड लोणी रोडवर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर गतिरोधक तात्काळ बसविण्या करिता संबंधित यंत्रणेला आपल्या स्तरावरून योग्य ती कारवाई जिल्हाधिकारी वाशिम यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. श.प्र.

# भरजहॉगीर येथे महाराजस्व अभियान उत्साहात

रिसोड : तालुक्यातील भर जहांगीर येथील श्री शिवाजी विद्यालयामध्ये १५ मे रोजी महसूल विभागाच्या माध्यमातून महाराजस्व अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संचालक डॉ. श्रीराम घरकळ, माजी जि.प. सदस्य अमित खडसे, डॉ. श्रीराम गरकळ, प्रा. पंढरीनाथ चोपडे, बबन सभादिंडे, रविंद्र चोपडे, रवीआढाव, अशोक सोगे, दुय्यमउप निबंधक बा. श्री. मदने, समाधान जावळे, पी. एस ईबर, रविंद्र खंदारे, राजेंद्र जाधव, नितेश कल्पांडर, विजया राऊत, प्रकाश कोवे, राजु देशमुख, यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनात मंडळ अधिकारी समाधान जावळे यांच्या नेतृत्वात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान घेण्यात आले. सदर अभियान मध्ये आधार नोंदणी, आरोग्य तपासणी, अँग्रीटेक नोंदणी तसेच इतर विभागाचे मार्गदर्शनपर स्टॉल लावण्यात आले होते. शिवारातील जिवंत सातबारा, फेरफार, पांदन रस्ता दुरुस्ती, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, संजय गांधी, श्रावणबाळ, दिव्यांगाचे प्रमाणपत्र मंजुरी आदेश तसेच ऑनलाईन रेशनकार्ड क्योआर कोड बचत बचतगटांना कर्ज मंजुराचे धनादेश वाटप, घरकुल लाभार्थ्यांचे मंजुरीचे आदेश व इतर उपस्थित लाभार्थ्यांना विविध प्रकारचे लाभवाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मनिष गायकवाड यांनी केले. ग्रामअधिकारी धनंजय काष्टे व पंढरीनाथ चोपडे यांनी आभार मानले. श.प्र.

# भावना पब्लिक शाळेच्या विद्यार्थीनीची सोनेरी झेप




रिसोड : -पुंडलिक नगर, देगाव फाटा येथील भावना पब्लिक स्कूल म्हणजे शिक्षणा सह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवनारे एक हक्काचे ठिकाण जेथे विद्यार्थ्यांना शिक्षणच नाही तर त्यांच्या अंगी असलेल्या इतर कलागुणांना ओळखून त्यात त्यांना विशेष प्रशिक्षण दिले.

आधुनिक भारतासाठी लागणाऱ्या खेळाडूंना यामार्फत घडविण्याचे काम संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेऊन दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना एक हक्काचे व्यासपीठ तयार करून दिल्या जाते त्याचबरोबर त्यांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना वाव देऊन पुढील भविष्यासाठी त्यांना तयार करण्यात येते. त्याच्यातील एक अग्रगण्य नाव म्हणजे अर्षती विजयकुमार सरनाईक जिने आपल्याच नव्हे तर भावना पब्लिक स्कूलच्या शिरोपेचात मनाचा तुरा रोवण्याचे कार्य केले आहे. अर्षती सरनाईक हि २०२५-२६च्या शैक्षणिक क्षेत्रात देगाव फाटा स्तित भावना पब्लिक स्कूल मध्ये वर्ग दहावीला असताना भोपाळ येथे झालेल्या ६८ व्या नॅशनल रायफल शूटिंग मध्ये वैयक्तिक तसेच सांघीक प्रकारात गोल्ड मेडल प्राप्त करून आपले नाव सोनेरी अक्षरात लिहिले आहे. त्याच बरोबर राज्यस्तरीय स्पर्धेत सुद्धा तिने कांस्य पदक मिळविले होते. अर्शती सरनाईक हिने आतापर्यंत चार राज्यस्तरीय स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला आहे त्याचबरोबर मागच्या वर्षी तिने राष्ट्रीय पातळीवर झालेल्या शूटिंग स्पर्धेत एकूण देशातून ती १९व्या क्रमांकावर राहिली होती. तिच्या या भरीव कामगिरीचे सर्वत्र कौतुक होतआहे आमदार गवळी यांनी तिचे विशेष कौतुक केले. कौतुक करतांना भावनाताईने म्हटले की भविष्यात आपल्या भागातील गुणवंत खेळाडू जे अर्शती च्या आदर्श घेऊन समोर येतील सर्व सुविधा आपण स्थानिक पातळी वर उपलब्ध करून देण्यात येतील यामुळे खेळाडू मागे राहणार नाहीत.(वि. प्र)

# वयाच्या ४७ व्या वर्षी दहावीची परीक्षा पास

## मोहम्मद जमील यांच्या संघर्षाला यश, ३१ वर्षांनंतर दिली होती परीक्षा



रिसोड : रिसोड शहरातील लोणी फाटा येथील गादी कारखाना व्यावसायिक मोहम्मद जमील नूर मोहम्मद वय ४७ वर्ष यांनी दहावीच्या परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे. सध्या स्थितीत मोहम्मद जमील यांचे हे यश चर्चेचा विषय ठरत आहेत. तब्बल ३१ वर्षांनंतर मोहम्मद जमील यांनी दहावीची परीक्षा देत यश मिळवले आहे वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांनी दहावीची परीक्षा पास करून युवकांना एक प्रेरणादायी संदेश दिला आहे.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुप्रसिद्ध विधान शिक्षणाचे सामर्थ्य अधोरेखित करते. याचा अर्थ शिक्षण माणसाला अन्याय, शोषणाविरुद्ध लढण्याची ताकद आणि आत्मसन्मान देते, जसे वाघिणीचे दूध पिऊन बछडा बलवान होतो. शिक्षणाला वयाची मर्यादा नसते, हे पुन्हा एकदा सिद्ध करत रिसोड येथील ४७ वर्षीय मो. जमील नूर मोहम्मद यांनी तब्बल ३१ वर्षांनंतर पुन्हा परीक्षा केंद्रावर जाऊन दहावीची परीक्षा दिली होती. मो. जमील नूर मोहम्मद यांनी १९९५ साली १० विचि परिक्षा दिली होती मात्र त्यावेळी नापास झाले होते. या कारणांमुळे शिक्षण मध्येच सोडावे लागले होते. मात्र शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा कायम मनात होती. अखेर त्यांनी धाडस करून पुन्हा अभ्यास सुरू केला आणि यावर्षी दहावीच्या परीक्षेला बसण्याचा निर्णय घेत ३१ वर्षांनंतर पुन्हा परीक्षा केंद्रावर आपल्या मुलाच्या वयाच्या विद्यार्थ्यांसोबत परीक्षा दिली. अनेक असंख्य विद्यार्थ्यांनी त्यांच्या या निर्णयाचे कौतुक करत त्यांना परीक्षेबद्दल धाडसही दिला व त्यांना काही मार्गदर्शन सुद्धा केले असल्याचे जमील यांनी सांगितले. त्यांच्या या निर्णयाचे अनेकांनी कौतुक केले असून 'शिकण्याला वय नसते' असा संदेश त्यांनी समाजाला दिला आहे. मोहम्मद जमील यांचे तीन मुले उच्चशिक्षित आहे. मोठा मुलगा डॉक्टरी करत असून धाकटा हा इंजीनियरिंग करत आहे. तर लहान मुलगा हा बारावीला असल्याचे यावेळी जमील यांनी सांगितले. परीक्षेचा निकाल लागताच मोहम्मद जमील व त्यांच्या परिवारामध्ये

आनंदाचे वातावरण दिसून आले त्याचा निकाल संगणकावर त्यांच्या मुलाने पाहिले व त्यांना याबाबत सूचना दिली पेढे वाटत मोहम्मद जमील यांनी आपल्या या यशाचा आनंद परिवार व मित्र सोबत साजरा केला. श.प्र.

# मेहनत आणि जिद्दीच्या भरोशावर जग जिंकता येते



## ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचे प्रतिपादन

रिसोड : तालुक्यातील ग्रामीण भागातून यावर्षी झालेल्या पोलीस भरती मध्ये मुले व मुली यांची उत्कृष्टकामगिरी बद्दल

रिसोड पोलीस स्टेशनच्या वतीने भरती झालेल्या मुली व मुलांचे एका छोट्याखानी कार्यक्रमाचे आयोजन केले होते यामध्ये चव्हाण यांनी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की मी पोलीस झालो म्हणजे इथेच न थांबता आणखीन मोठ्या पदावर जाण्याची जिद्द ठेवा तसं पाहिलं तर इतर डिपार्टमेंट पेक्षा पोलीस मध्ये आपल्याला देशसेवा आणि समाजसेवा करण्याची जास्त संधी आहे कारण की काहीही झालं तरी सगळ्यांना हवा वाटते ही जबाबदारी पोलिसाची आहे हे काम यांनी करावे त्यामुळे आपण मेहनत करून ही जबाबदारी पार पाडावी आणि आता आपली जबाबदारी वाढली. तुम्ही एक जबाबदार व्यक्ती झाला त्यामुळे पहिले काम कामामुळेच तुमची किंमत समाजामध्ये, डिपार्टमेंट मध्ये आपोआप वाढते त्यामुळे आपण आपल्या कर्तव्यावर जास्त भर द्यावा व भविष्यात आणखीन मोठे व्हावे अशी शुभेच्छादिल्या, यावेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष विनोद पाटील खडसे रिसोड पोलिस स्टेशनचे कर्मचारी सुद्धा उपस्थित होते . यावेळी उपस्थितभरती झालेले ओंकार खडसे, मोहन पंडीत, ऋषिकेश घोडे, पूजा वाळके यांचे कॅरेक्टर सर्टिफिकेट पोलीस स्टेशनच्या वतीने ताबडतोब देण्यात आले( वि. प्र )

# सवलत 'स्मार्ट कार्ड' साठी ग्राहकांची आर्थिक लुट

## बुलढाणा जिल्ह्यातील काही महाठगांचा रिसोडच्या ग्रामीण भागात ठिय्या



रिसोड: महाराष्ट्र राज्य मार्ग परीवहण महामंडळ चे प्रवास सवलतीचे 'स्मार्ट कार्ड ' हे प्रामुख्याने एसटी बसस्थानक, डेपो कार्यालय आणि अधिकृत विक्रेत्यांना दिलेल्या विशिष्ठ अंतरातील गावातील जात स्मार्ट कार्ड काढण्याचा नियम आसतांनी थेट बुलढाणा जिल्ह्यातील बाळासाहेब देविदास गावंडे हा व्यक्ती रिसोड तालुक्यातील भर जहागीर येथिल ग्राहकाकडुन सुमारे ३०० रूपये प्रती कार्ड पैसे घेऊन स्मार्ट कार्ड घेत आसल्याने संबंधित विभागाची याला मुक संमत्ती तर नाही ? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

राज्यशासणाच्या आदेशानुसार एसटी महामंडळाद्वारे प्रवासा साठी सवलतीच्या प्रवासाचा अधिकृत पुरावा म्हणून 'स्मार्ट कार्ड ' काढण्या साठी अधिकृत एजेंट मार्फत प्रारंभ झालेला आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, दिव्यांग, स्वातंत्र्य सैनिक, महिला योजना लाभार्थी इत्यादींना मिळणारी प्रवास सवलत या कार्डद्वारे अधिकृतपणे सिद्ध होते. त्याच प्रमाणे तिकीट काढण्याची प्रक्रिया सोपी होते. प्रत्येक वेळी कागदपत्रे दाखवण्याची गरज कमी होते. स्मार्ट कार्ड स्कॅन करून तत्काळ सवलतीचे तिकीट मिळते. फसवणुक आणि गैरवापर कमी होतो. कार्ड मध्ये लाभार्थ्यांची माहिती, फोटो आणि तपशील डिजिटल स्वरूपात असल्याने बनावट सवलती रोखता येतातवेळेची बचत बस स्थानकावर किंवा प्रवासा दरम्यान तपासणी लवकर होते. त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचतो. डिजिटल व सुरक्षित व्यवस्थकार्ड हरवल्यास पुन्हा मिळविणे शक्य असते. माहिती संगणकीय पद्धतीने सुरक्षित राहते. शासनाच्या योजनांचा लाभ सहज मिळतो महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रवास सवलत योजनांचा लाभ स्मार्ट कार्डमुळे सुलभ होतो.

संपुर्ण राज्यात उपयोगहे कार्ड राज्यातील बहुतांश एसटी बस सेवांमध्ये वापरता येते, त्यामुळे प्रवाशांना सुविधा मिळते. पारदर्शकता वाढते सवलतींचा योग्य लाभ योग्य व्यक्तींनाच मिळत असल्याने प्रशासनात पारदर्शकता वाढते. थोडक्यात, एसटी प्रवास सवलतीचे स्मार्ट कार्ड हे प्रवाशांसाठी 'सुविधा, सुरक्षितता आणि सवलतीचा विश्वासाई पुरावा' मानले जाते. परंतु मागील दोन महिण्यापासुन रिसोड येथिल 'स्मार्ट कार्ड ' सेंटर वर कमालीची गर्दी वाढल्याने बुलढाणा जिल्ह्यातील काही महाभागानी रिसोड मधील सेंटरवर होत आसलेल्या गर्दीचा फायदा घेण्यासाठी. रिसोड तालुक्यातील मांगुळझणक, भर जहागीर आशा मोठ्या गावामध्ये काही दलाल हताशी धरीत एस. टी. स्मार्ट कार्ड साठी १९९ ऐवजी थेट ३०० रूपये उकळत आसल्याची. बाब भर जहागीर येथे एका' स्टींग ऑपरेशन' मध्ये उघड झाली आहे. स्थानिक गणेश मंदिरा मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील बाळासाहेब देविदास गावंडे हा युवक आपल्या दोन साथीदारा सोबत ग्राहकांची मोठी लुट करीत आसल्याचे उघड झाले. याच ठिकाणावरून रिसोड आगाराचे आगार प्रमुख निलेश बोदडे, एसटी. स्मार्ट कार्ड कॉर्डीनेटर यांना संबंधित प्रकाराची आपबीती कळविण्यात आली. ता.प्र.

एसटी महामंडळाच्या स्मार्ट कार्ड साठी फक्त १९९ रूपये खर्च येतो. त्यामुळे ग्राहकाकडुन जादा पैसे घेत ग्राहकांची लुट घेणे तात्काळ थांबविणे आवश्यक आहे. ग्राहका कडुन जादा पैसे घेणे हा कायद्याने गंभीर गुन्हा आहे. एसटी महामंडाचे प्रवास सवलती चे स्मार्ट कार्ड योजना योग्य आहे. मात्र सध्या काही ठिकाणी बाहेरील जिल्ह्यातील व्यक्तींमार्फत कॅम्प घेऊन कार्ड काढण्याच्या नावाखाली नागरिकांची दिशाभुल व आर्थिक लुबाडणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणतेही ℸℶ स्मार्ट कार्ड केवळ अधिकृत व्यक्ती किंवा अधिकृत केंद्राकडूनच काढावे. अन्यथा चुकीची माहिती, बनावट नोंदणी किंवा कार्ड न मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. आशा प्रकारची माहीती रूपेश बाजड अधिकृत ℸℶ सेंटर रिसोड यांनी दिली आहे.

निलेश बोदडे (एसटी आगार व्यवस्थापक रिसोड)

# बाजार मधील बांधकामे नियमाकुल करूनच विकास करा

## उच्च न्यायालयात डॉ देशमुख यांची याचिका



रिसोड : शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या बाजार समितीच्या मुख्य आवारातील विकासकामांचा आणि ले-आऊटचा वाद आता कमालीचा पेटला आहे. पुणे येथील पणन संचालनालयाने मंजूर केलेल्या ले-आऊट प्लॅनची नगर परिषद रीतसर अंतिम मंजुरी घेऊनच बाजार समितीने पुढील विकास करावा, तसेच बाजार समिती आवारात आतापर्यंत झालेली बांधकामे नियमाकुल करून गाळे धारकांना दिलासा मिळावा म्हणून, या संदर्भात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक महत्त्वाची याचिका दाखल करण्यात आली होती.

दरम्यान बाजार समितीने स्थानिक नियोजन प्राधिकरणाला अंधारात ठेवून सामान्य शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा खळबळजनक आरोप याचिकाकर्ते डॉ. सी. के. देशमुख आणि ॲड. संतोष पोफळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यापूर्वी दिलेल्या स्पष्ट आदेशांना पायदळी तुडवत बाजार समिती प्रशासनाने आपला मनमानी कारभार सुरूच ठेवल्याने, आता थेट हायकोर्टात 'कंटेम्प्ट पिटिशन' (अवमान याचिका क्रमांक १७४/२०२६) दाखल करण्यात आली आहे. याचिकेची दखल घेत खंडपीठाने संबंधित दोषींना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, पुढील अंतिम सुनावणी आता ११ जून २०२६ रोजी निश्चित केली आहे. पुणे येथील पणन संचालनालयाने २९ मे २०१९ रोजी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गट क्रमांक १०/६ मधील मुख्य आवाराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली होती. ही मंजुरी देताना संचालनालयाने काही अटी घातल्या होत्या. त्यानुसार, या ले-आऊट प्लॅनला स्थानिक सक्षम प्राधिकरणाची अंतिम मंजुरी घेणे कायदेशीररित्या बंधनकारक होते. मात्र, कायद्याला आणि नियमांना पूर्णपणे हरताळ फासत बाजार समिती प्रशासनाने न. प. चीकोणतीही अंतिम मंजुरी घेतली नाही. इतकेच नव्हे तर, मूळ ले-आऊटमध्ये नियमबाह्य आणि बेधडक फेरबदल करून मोकळे प्लॉट, दुकाने आणि व्यावसायिक गाळ्यांचे अनधिकृत बांधकाम करत कोट्यवधी रुपयांचे बेकायदेशीर हस्तांतरण केले असल्याचे कागदोपत्री पुरावे डॉ देशमुख यांनी पत्रकार परिषद मध्ये सादर केले बाजार समितीच्या बेकायदेशीर कारभाराची तक्रार होताच, मुख्याधिकाऱ्यांनी बाजार समितीला नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) नुसार कृ.उ.बा.स.च्या सचिवांना थेट कायदेशीर नोटीस बजावली आहे.

यापूर्वी याचिकाकर्ते डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी दाखल केलेल्या 'रिट पिटिशन' ८३५९ २०२५ वर सुनावणी करताना हायकोर्टाने बाजार समितीला कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करण्याचे कडक आदेश दिले होते. मात्र, कोर्टाच्या आदेशालाही न जुमानता पडद्यामागे अनधिकृत बांधकामे आणि कोट्यवधी रुपयांच्या मोकळ्या भूखंडांचे परस्पर बेभाव हस्तांतरण जोमाने सुरूच राहिले. न्यायालयाच्या आदेशाचा हा थेट अनादर असल्याचे निदर्शनास आणून देत हायकोर्टात अवमान याचिका दाखल करण्यात आली.

यावर ८ मे २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत हायकोर्टाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. न्यायालयाने बाजार समितीच्या तत्कालीन सचिवांसह संबंधित प्रतिवादींना ११ जून २०२६ रोजी कोर्टात हजर राहून उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. ता.प्र.

### आम्ही कायद्यानसारच काम केले' – सचिव विजय देशमख

रिसोड बाजार समितीवर करण्यात आलेले आरोप पूर्णपणे चुकीचे, राजकीय हेतूने प्रेरित आणि वस्तुस्थितीला धरून नसलेले आहेत. पणन संचालनालय यांनी दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहूनच बाजार समितीच्या आवारात विकासकामे केली आहे. नगर परिषद रिसोड च्या २९ जानेवारी २०२६ च्या पत्रा नुसार एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली तरतुदीनुसार बाजार समितीने प्रस्ताव सादर केला आहे. न्यायाल्यीन आदेशाचा कुठलाही अवमान केलेला नाही

# रिसोड तालुक्यात यावर्षी हळद व चिया पिकाच्या लागवडीमध्ये वाढ होण्याचे संकेत

रिसोड: सोयाबीन सह इतर खरिपाच्या पिकाचे भाव व उत्पादन खर्च पाहता यावर्षी हळद व चिया लागवड क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. यासोबतच गेल्या दोन वर्षापासून रिसोड तालुक्यात या पिकाला काही शेतकऱ्यांनी प्राधान्य दिल्याने व त्यांना उत्पादन चांगले होऊन यावर्षीच्या भावही चांगला मिळाला आहे त्यामुळे हळदी सोबतच चीया पिकाचेही लागवड यावेळेस वाढण्याची शक्यता आहे विशेषतः वाशिम जिल्ह्यासह विदर्भ आणि मराठवाड्यात अनेक शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी हळद, चिया लागवडीला प्राधान्य देत आहेत. मान्सूनचा अंदाजा बाबत हवामान विभागाने तथा खाजगी हवामान तज्ञांनी सरासरी एवढा पाऊस पडणार असल्यामुळे हळदी सह खरिपातील पिके समाधानकारक येतील तसेच हळद व चिया पिकाला कमी जोखीम आणि चांगला नफा मिळत असल्याने यंदा लागवड क्षेत्रात मोठी वाढ अपेक्षित आहे. कृषी विभागाकडूनही हळद लागवड वाढ होऊन तालुक्या जवळपास ८ हजार हेक्टर वर हळद लागवड होणार असल्याची कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.

याबाबत हळद उत्पादक शेतकऱ्यांना लागवड ,सुधारित बियाणे ,व तांत्रिक मार्गदर्शन दिले जात आहे. कृषी विज्ञान केंद्र तर्फे सुद्धा शेतकऱ्यांना हळद उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन दिले जात आहे विशेष म्हणजे रिसोड मार्केट हे हळदीसाठी अतिशय चांगले मार्केट बनले असून यावर्षीपासून चीयाचाही खरेदीला चांगला प्रतिसाद मार्केट कमिटीला मिळाला आहे एकंदरीत उत्पादन खर्च तसेच मिळालेले भाव याची तुलना केल्यास हळद व चीया पिके आर्थिक दृष्ट्या चांगले पीक होत असून यावर्षी या पिकाची लागवड जास्त होण्यार असे कृषी विभागाचे मत आहे( वि. प्र )